ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
*January - June 2021- Vol. 10 No. 1*

# महात्मा गांधीच्या विचाराची प्रस्तुतता

**डॉ.नामदेव बाबुराव डोंगरे**
डॉ.तात्यासाहेब नातू कला व वाणिज्य महाविद्यालय,
मार्गताम्हाने ता.चिपळूण जिल्हा रत्नागिरी

★★★

निष्कर्ष महात्मा गांधी हे एक अध्यात्मवादी व आदर्शवादी विचारवंत होते.सत्य व अहिंसेच्या बळावर त्यानी उच्च आदर्शाची समाजामध्ये जोपासना केली.देशाने आज वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये प्रगती केली तरीही महात्मा गांधीजीनी सांगीतलेल्या सत्य आणि अहिंसेच्या मार्गावरुनच प्रत्येकाला वाटचाल करावी लागेल. महात्मा गांधी यांचा जन्म दिवस संपूर्ण जगामध्ये आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणून साजरा केला जातो. यावरून गांधीजीचे विचार संपूर्ण मानवजातीसाठी प्रस्तुत आहेत.त्यामुळे जगाला गांधींजीच्या विचारानेच मार्गाक्रमन करावे लागेल. ामलूवतकरु सत्त्य, अहिंसा, अध्यात्म, ईश्वर, प्रस्तुतता, मानवता

**प्रस्तावना**— सत्य आणि अहिंसा या मानवी मुल्याची संपूर्ण जगाला देण देणारे महात्मा गांधी हे एक आदर्ष व अध्यात्मवादी पुरुश होते. ते मानवतावादी विचारवंत होते. धर्म आणि राजकारन याला दृश्टी दिली.आई—वडीलंच्य धार्मिक विचारांचा प्रभाव सुरवातीपासुन त्यंच्यवर पडला होता.गांधीजीवर गीता या हिंदु धर्मातील ग्रंथाचा सर्वात अध ीक प्रभाव पडला होता.गीतेला ते आपला मार्गदर्शक मानत होते. संकटकालात गीतेनेच माझे मार्गदर्शन केले आहे असे गांधीजीनी म्हटले आहे. गीतेप्रमानेच रामायंण,महाभारत आणि बौद्ध धर्मातील ग्रंथाचा प्रभाव पडला होता अहिंसक विचाराचे शिक्षन त्यांना बायबल या ग्रंथातुन मिळाले.

येशु ख्रिस्ताचे पुढील वाक्य त्यांच्या मनावर बिंबले होते देवा, त्यांना क्षमा कर,कारन ते काय करतात ह्यांची त्यांना जाणीव नाही.गांध ीजिंच्या नेतीकने व राजकीय विचारावर जॉनरस्किन रस्किन डेव्हिड थुरो,टोलस्टोय ई.विचारांचा प्रभाव पडला आहे. न्द जव जीम रेंज ह्या पुस्तकाने त्यांच्या जीवनाला नवे वळण दिले. ह्या विचारातुन श्रमाला जीवनात महत्त्वाचे स्थान दिले.रामचंद्रजी ह्या समाजसुधारक कवीचाही प्रभाव गांधीजीच्या नेतिक व धार्मिक जीवनार झाला होता.याशिवाय गांधीजिंच्या काळात भारतात जी राजकीय परीस्थिती होती तीचा प्रभाव गांधीजीवर पडला होता.पारतंर्त्य व दारीद्रय ह्यानी त्यांच्या विचाराला चालना दिली. सत्य व अहिंसा हा त्यांच्या विचारांचा पाया होता.०यक्ती व समाजाला ते नेतिक बनवू इच्छित होते.त्यासाठी त्यांनी ही दोन तत्वे महत्त्वाची मानली.त्यांच्या मते सत्य व अहिंसा एक दूसरयाला पूरक आहेत.सत्याशिवाय कोणतेही तत्व पुर्ण होत नाही.

**संशोधन पद्धती**— प्रस्तुत संषोधन पेपर संदर्भ ग्रंथाच्या आधारे तयार करण्यात आला आहे. महात्मा गांधीजिंच्या राजकीय विचारांचा आधार सत्य हे तत्व आहे.सत्य हे त्यांनी साध्य मानले होते.अहिंसा या साधनाद्वारे सत्य साध्य करता येते. अशी त्यांची धारना होती.सत्याशिवाय कोणतेही तत्व पूर्ण नाही,असे स्पस्ट करुन त्यांनी सत्त्याचे सापेक्ष सत्य आणि निरपेक्ष सत्य असे दोन प्रकार सांगीतले आहेत.सापेक्ष सत्याची कल्पना ही परिस्थितीनुसार बदलत असते. सापेक्ष सत्याच्या साहाय्याने ०यक्ती निरपेक्ष सत्याकडे जाते.निरपेक्ष सत्य म्हणजे सत्त,चीत्त व आनंद यांचा सुंदर समन्वय होय.निरपेक्ष सत्य म्हणजे ईष्वर होय. गांधीजिंच्या मते,निरपेक्ष सत्य हे श्रेष्ठ दर्जाचे सत्य असते.ते प्राप्त करन्ह्यासाठी सापेक्ष सत्त्याचा मार्ग स्वीकारावा लागतो.गांधींजीच्या मते, सत्य, प्रेम, आत्मबलिदान,बंधुत्व याद्वारे निरपेक्ष सत्य प्राप्त करता येते. गांधींजीनी सत्याचे प्रयोग या आत्मचरीत्रात सत्त्याची महती वर्णीलेली आहे.गांधीजीच्या मते सत्त्यामध्ये न्यायाचा अंतर्भाव असतो.अधर्म व अन्याय दूर करन्याचे सामर्थ्य सत्त्यामध्ये असते. सद्य परीस्थितीमध्ये भोतिक सुख प्राप्त करण्यासाठी मानव असत्त्य व अनेतिक मार्गाचा अवलंब करत आहे.गांधीजीनी सत्त्याचे महत्व विशद करताना सहस्र सूर्य एकत्र केले तरीही यावरुन देनंदिन मानवी जीवनामध्ये सत्त्याचे महत्व अधोरेखित होते.

सत्त्याप्रमानेच गांधीजीनी आपल्या तत्त्वज्ञानात अहिंसा या तत्वाला अतिषय महत्व दिले आहे.गांधीजीच्या मते अहिंसेच्या मार्गानेच सत्त्य प्राप्त करता येते.सत्त्य व अहिंसा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.कारण सत्त्य व अहिंसा एकमेकापासून अलग करणे कठीण असते.पष्थ्वीच्या पाठीवरील कोणत्याही वस्तुमात्राला व प्राणिमात्राला विचाराने,शब्दाने वा कृत्याने संभवनारी दुखापत टाळने अशी अहिंसेची ०याख्या हरिजन मधील एका लेखात केली आहे.अहींसेला ते आत्मिक शक्ती म्हणतात.गांधीजीच्या मते अहिंसेचे कार्य केवळ नकारात्मक नाही तर सकारात्मक आहे.त्यांच्या मते परीपूर्ण अहिंसा ही केवळ ईष्वरालाच साध्य होवू शकते मनुष्य मात्र हा संपूर्णपणे अहिंसक होऊच शविचाकत नाही.गांधींजिंच्या विचारराची प्रस्तुतता अधोरेखित करताना श्री.मोहन धारीया म्हणतात. गांधीजिची हत्या एका माथेफिरुने केली, असे आपण म्हणतो,पण त्यांच्या विचारांची हत्या आपण सर्वानी केली. यावरुन गांधीजिंच्या विचाराची प्रस्तुतता २१ ०या शतककातही अधोरेखित होते.आज दहषतवादाचा प्रश्न संपूर्ण जगाला भेडसावत आहे. दहशतवादामुळे अनेक निष्पापांचे जिव जात असुन जागतिक शांतता धोक्यामध्ये आलेली आहे. अशावेळी महात्मा गांधी यांनी सांगीतलेला ०यापक अहिंसेचा अर्थ सर्वानी घेतल्यास जगामध्ये

षांतता नांदेल.व हिंसाचार थांबण्यास मदत होऊ षकते.मानवी अपरीपूर्णतेमुळे काही ठिकाणी हिंसा अटळ असते. पण गांधींजिंच्या तत्वज्ञानात हिंसेला अजिबात थारा नाही.यावरुन गांधींजिंच्या अहिंसारुपी तत्वज्ञान जगाला किती उपयुक्त आहे हे गांधीजिंनी जगाला प्रेम आणि मानवतेची षिकवन दिली.प्रेमषक्ती ही आत्मषक्ती किंवा सत्यषक्तीसारखीच आहे.ती षक्ती नसेल तर जग नश्ट होईल. सत्य अहिंसा या बलाढय निषस्त्र साधनाद्वारे प्रेम व मानवतेच्या आध ारे गांधीजिनी संपूर्ण जगाला मानवतेची षिकवन दिली. यामुळे गांध ीविचार आजही उपयुक्त आहे. गांधीजिंनी सांगीतलेल्या विचाराषिवाय जगाला पर्याय नाही. २१ ०या शतकात ज्या अनेकविध समष्या निर्माण झाल्या आहेत.त्या वेगवेगळ्या समष्यावर गांधीविचार हेच उत्तर आहे. गांधीजीनी संपूर्ण आयुष्यभर सर्वधर्म समभाव जोपासला. भारताची फाळणी होउन धर्माच्या आधारावर दोन स्वतंत्र राष्ट्रे उदयाला आली. गांधीजिनी शेवटच्या क्षनापर्यंत फाळणीला विरोध केला पण त्यांना त्यात यश आले नाही.नोखालीतल्या हिंसेच्या तांडवाने गांध ीजिंच ईद्य वेदनेने अक्षरषः कळवळून गेल. नोखालीतल्या महिलांचे हंबरडे मला बोलावत आहेत. माझ्या अहिंसेची परिक्षा आता नोखालीतच होणार आहे. दुखितांचे दुखं निवारण झाल्याषिवाय मी नोखालीतुन हलनार नाही.त्यात मला मृत्त्यू आला तरी चालेल,पण पराभूत होउन मी परतनार नाही. अशी प्रतीज्ञा करुन गांधीजी नोखालीला निघाले. नोखालीच्या शांतीयात्रेत गांधीजिनी रात्रीचा मुकाम गरीबांच्या झोपडित केला. हिंदु–मुसलमानाच्या घरात राहिले हरिजन, कुंभार ,विणकर ,शेतकरी, ब्राह्मण, नाहवी, वाणी, लोहार अशा अनेकाच्या कुटुंबात राहिले. गांधीजीच्या अथक प्रयत्नामुळे नोखाली पुन्हा एकजिव होण्यास मदत झाली.

**समारोप** – भारतासारख्या विशाल लोकसंख्या असलेल्या देशात विविध धर्माचे लोक वास्तव्य करतात.देशामध्ये खऱ्या अर्थाने बंधुभावाची जोपासना करायची असेल तर गांधीजीनी सांगीतलेल्या सत्य आणि अहिंसेच्या मार्गावरुन प्रतेकाला वाटचाल करावी लागेल. गांधीजीचे विचार संपूर्ण मानवजातीसाठी प्रस्तुत आहेत.जगाला गांध ीजीच्या विचारानेच मार्गाक्रमन करावे लागेल.

## संदर्भग्रंथ सुची

१. भारतीय राजकीय विचारवंत,श्रीकांत वी.देशपांडे पष्ठ क्र. ३०,श्री.मंगेष प्रकाषन,नागपूर,प्रथम आवत्ती.

२. भारतीय राजकीय विचार,प्रा.पाटील बी.बी.,सो.चव्हाण ऊर्मिला, पष्ठ क्र.९७,फडके प्रकाषन,कोल्हापूर.

३. आधुनिक भारतातील राजकीय,डॉ.भोळे भास्कर लक्ष्मण, पष्ठ क्र.४७०,पिंपळापुर – कंमपब्लषर,नागपूर.

४. लोकराज्य, ऑक्टोबर २०१०, पृष्ठ क्र.१८,महात्मा माणुसकीची मषाल,माहिती व जनसंपर्क महासंचानलाय,महाराश्ट्र षासन.

५. शोध महात्मा गांधीचा,सारथी अरुण,खंड एक, पृ क्र.५१२.

६. अज्ञात गांधी,देसाई नारायणभाई पृष्ठ क्र.५१२.